# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ३४२/२०२२

तक्रारकर्ता, श्री.विजय अर्जुन हुमणे
गणपत मिस्त्री चाळ, कुंदन अपार्टमेंट समोर
वांद्रापाडा, अंबरनाथ (प), जि.ठाणे

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, पाणी पुरवठा व जलनिस्सारण विभाग
अंबरनाथ नगर परिषद, अंबरनाथ
ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, पाणी पुरवठा व जलनिस्सारण विभाग
अंबरनाथ नगर परिषद, अंबरनाथ
ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, आरोग्य विभाग
अंबरनाथ नगर परिषद, अंबरनाथ
ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, आरोग्य विभाग
अंबरनाथ नगर परिषद, अंबरनाथ
ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १९/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २७/१२/२०२१ | ४/२/२०२२ | १/२/२०२२ | २२/२/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२७/४/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिलेली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १९/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" मुख्याधिकारी अंबरनाथ नगरपरिषद, गजानन भिवा हुमणे, भिवा हुमणे चाळ, आर्शिवाद हॉस्पिटल समोर, अंबरनाथ दि.१५.०६.२०१० रोजी यांनी दाखल केलेल्या आवक क्रमांक २०५५ तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयातून केलेल्या कार्यवाहीची छायाप्रत मिळण्याबाबत व इतर २ मुद्यांची माहिती"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.२२/२/२०२२ रोजी सुनावणी घेऊन, "*जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, पाणी पुरवठा विभाग व विभाग प्रमुख, आरोग्य विभाग यांनी तक्रार अर्ज क्र.०५, आवक क्र.२०५५ व ७५०५ तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची छायांकित प्रत अपीलार्थी श्री.हुमणे यांना ०७ दिवसांत द्यावी..*" असा निर्णय दिलेला आहे.

सुनावणीस अपीलकर्ता उपस्थित असून, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सुनावणी सूचना प्राप्त होऊनसुध्दा अनुपस्थित आहेत.

नस्तीवरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, तक्रारदार यांनी दि.२७/१२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये माहितीची मागणी केली होती. सदर अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.४/२/२०२२ च्या पत्रान्वये माहिती दिलेली आहे. या माहितीने समाधान न झाल्याने तक्रारदार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील सादर केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२२/२/२०२२ रोजी आदेश पारित केले की, "*जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,*

*पाणी पुरवठा विभाग व विभाग प्रमुख, आरोग्य विभाग यांनी तक्रार अर्ज क्र.०५, आवक क्र.२०५५ व ७५०५ तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची छायांकित प्रत अपीलार्थी श्री.हुमणे यांना ०७ दिवसांत द्यावी.* " तथापि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर सुध्दा अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती दिलेली नाही. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी हे त्यांना सुनावणी सूचना प्राप्त होऊन सुध्दा अनुपस्थित राहिले आहेत, त्यामुळे त्यांचेकडून यासंदर्भात काही जाणून घेता आले नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

१. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद यांनी दि.२२/२/२०२२ रोजी दिलेल्या प्रथम अपील निर्णयानुसार, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा व जलनिस्सारण विभाग **तसेच** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, आरोग्य विभाग, अंबरनाथ नगरपरिषद यांनी **तक्रारकर्ता यांना द्यावयाची माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दि.२२/२/२०२२ रोजीच्या प्रथम अपील आदेशानंतरसुध्दा **तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा व जलनिस्सारण विभाग तसेच तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, आरोग्य विभाग, अंबरनाथ नगरपरिषद** यांनी अद्यापपर्यंत माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२५/६/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १९ मे, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा व जलनिस्सारण विभाग, अंबरनाथ नगरपरिषद <u>**- यांना प्रत**</u> --
विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,
पाणीपुरवठा व जलनिस्सारण विभाग, अंबरनाथ नगरपरिषद,
अंबरनाथ, ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१ <u>**यांचेमार्फत रवाना.**</u>

तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, आरोग्य विभाग, अंबरनाथ नगरपरिषद <u>**- यांना प्रत**</u> -
-- विद्यमान जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख,
आरोग्य विभाग, अंबरनाथ नगरपरिषद,
अंबरनाथ, ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१ <u>**यांचेमार्फत रवाना.**</u>

<u>**विवेचन**</u>

उपरोक्त आदेशान्वये विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आले होते. सदर प्रकरणाची सुनावणी आज दि.२५/६/२०२५ रोजी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुरेश पाटील सेवानिवृत्त व श्री.संदिप वसंत कांबळे, आस्थापना अधिक्षक सध्या कार्यरत- कुळगाव बदलापूर नगरपरिषद आणि श्री.सुहास सावंत, स्व.निरीक्षक, सध्या कार्यरत -कुळगाव बदलापूर नगरपरिषद उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुनिलकुमार जाधव, उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग, अंबरनाथ नगरपरिषद अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुनिलकुमार जाधव यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती देण्यात आली आहे.

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुरेश पाटील व श्री.संदिप वसंत कांबळे आणि श्री.सुहास सावंत यांनी एकत्रित दि.२६/६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये आयोगास खुलासा सादर केला आहे.

सदर खुलाशावर पुढील सुनावणीत निर्णय घेण्यात येईल.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२५/८/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २५ जून, २०२५ .

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

Comp-३